# ॥ इंद्रधनुष्य ॥



# ज्ञानसाधनेची पंचावन्न वर्षे

# के. के. वाघ शिक्षण संस्था

**पद्मश्री** कर्मवीर काकासाहेब वाघ यांनी समाजाच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक विकासाठी के. के. वाघ शिक्षण संस्थेची १९७० मध्ये स्थापना केली. बहुजन समाजाच्या मुलांनी शिकून रोजगार मिळवावा, समाजाच्या भौतिक, सामाजिक, बौद्धिक गरजा पूर्ण व्हाव्यात व समृद्ध समाज निर्माण व्हावा, हे स्थापनेमागे ठळक धोरण होते. सध्या संस्थेद्वारा २९ विविध महाविद्यालये, तंत्रनिकेतन, शाळा कार्यान्वित असून २३ हजार विद्यार्थी व १,९०० शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संस्थेत कार्यरत आहेत. अर्थात के.जी. ते पीएच.डी. पर्यंतचे शिक्षण देणारी संस्था होय. संस्थेने २०१९-२० हे वर्ष सुवर्णमहोत्सवी वर्ष म्हणून साजरे केले आहे. गुणवत्ता व विद्यार्थी विकास केंद्रीय शिक्षणावर भर देणारी शिक्षण संस्था म्हणून नावारूपास आली आहे.

सन १९७० मध्ये स्थापन झालेल्या रोपट्याचे आज ज्ञानरूपी वटवृक्षात रूपांतर झाले आहे. गेल्या ५५ वर्षांच्या कालावधीत संस्थेने अभियांत्रिकी आणि तंत्रशिक्षणाच्या विकासावर लक्ष केंद्रित करून अभियांत्रिकी, तंत्रशिक्षण व कृषी शिक्षणात महाराष्ट्रातच नव्हे तर देश पातळीवर नावलौकिक प्राप्त केलेला आहे. त्यासाठी संस्थेचे दिवंगत अध्यक्ष व प्रेरणास्थान आदरणीय कै. बाळासाहेब देवराम वाघ यांनी संस्था स्थापनेपासून विश्वस्त, उपाध्यक्ष व अध्यक्ष म्हणून तब्बल ५१ वर्षे संस्था यशस्वीपणे उभी केली. संस्था उभारणीत त्यांचा सिंहाचा वाटा आहे.



समीर बाळासाहेब वाघ
अध्यक्ष

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयास विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी), नवी दिल्ली यांच्याकडून ऑटोनॉमस अर्थात 'स्वायत्त' महाविद्यालयाचा दर्जा प्राप्त झाला आहे. तसेच, राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद, बंगलुरू (नॅक) यांच्याकडून 'अ' श्रेणीचा दर्जा प्राप्त आहे. त्याचप्रमाणे राष्ट्रीय स्तरावरील AICTE-CII सर्वेक्षणाद्वारे अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतनास चार वेळा 'सर्वोत्कृष्ट दर्जा' (Platinum Category) ने सन्मानित करण्यात आले आहे. अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या आयडिया लॅबसाठी अनुदान मिळवणारे के.के. वाघ हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील पहिले अभियांत्रिकी महाविद्यालय होय. आजमितीस अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सात विभागांना एन.बी.ए. मानांकन मिळाले आहे. यामध्ये कॉम्प्युटर, इलेक्ट्रिकल, केमिकल आणि इलेक्ट्रॉनिक अ‍ॅण्ड टेलिकम्युनिकेशन, इलेक्ट्रॉनिक, सिव्हिल आणि एमसीए या विभागांचा समावेश आहे.

के.के. वाघ तंत्रनिकेतन, नाशिकच्या सहा विभागांना एन.बी.ए. मानांकन प्राप्त आहे. कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, मेकॅनिकल इंजिनिअरिंग, इलेक्ट्रिकल इंजिअरिंग, केमिकल इंजिनिअरिंग, सिव्हिल इंजिनिअरिंग, आर्टिफिशियल इंटेलिजन्स व मशीन लर्निंग अशा विविध शाखांमध्ये डिप्लोमा प्रदान करणारे तंत्रनिकेतन आहे. याशिवाय 'अ‍ॅडव्हान्स डिप्लोमा इन इंडस्ट्रीयल सेफ्टी' हा कोर्सही येथे उपलब्ध आहे.


संस्थेने कृषी शिक्षणाच्या क्षेत्रातही कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, कृषी महाविद्यालय, कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, कृषी अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, कृषी व्यवसाय व्यवस्थापन व उद्यानविद्या महाविद्यालय अशी सहा महाविद्यालये आहेत. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीनंतर सर्वाधिक अभ्यासक्रम चालविणारी संस्था म्हणून नावलौकिक आहे. विशेष म्हणजे के. के. वाघ कृषी महाविद्यालयाने 'नॅक'चे मानांकन प्राप्त करून अ‍ॅक्रेडेशनचा मानतुरा खोवला आहे. महाराष्ट्रातील कृषी व कृषी संलग्न महाविद्यालयामध्ये 'नॅक' प्राप्त करणारे पहिले महाविद्यालय असण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे के. के. वाघ शिक्षणशास्त्र महाविद्यालयाने 'नॅक' मानांकन प्राप्त केलेले आहे.

नाशिकनगरी ही दादासाहेब फाळकेंची 'हरिश्चंद्राची फॅक्टरी' आहे. पण ते वैभव प्राप्त करण्यासाठी चित्रमहर्षी, कला महर्षी अभिनेते मिळावेत हे संस्थेचे स्वप्न होते. कवी कुसुमाग्रज आणि आदरणीय कै. बाळासाहेब (भाऊ) वाघ यांचा विशेष स्नेह होता. संस्थेने व्यापक दृष्टीने त्यासाठी चित्रकला, शिल्पकला महाविद्यालये, परफॉर्मिंग आर्टस् महाविद्यालये सुरू केले. अनेक चित्रकार शिल्पकार, गायक, वादक, अभिनेते घडविणारी हरिचंद्राची फॅक्टरी यशस्वी झाली आहे. नाशिकच्या सांस्कृतिक जीवनात भाऊसाहेबनगर, काकासाहेबनगर, पिंपळस व चांदोरी येथे वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयांची स्थापना केली असून यातून हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

शिक्षणाबरोबरच सामाजिक बांधिलकी म्हणून कर्मवीर काकासाहेब वाघ व्याख्यानमालेतर्गत पंचाहत्तर पुष्पे नाशिक शहराच्या विविध कलादालनांमध्ये गुंफण्यात आले. त्याचप्रमाणे आदरणीय कै. बाळासाहेब (भाऊ) देवराम वाघ यांचे स्मृतिप्रीत्यर्थ आजमितीस एकोणावीस पुष्पे गुंफण्यात आले. याप्रसंगी सामाजिक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील नावाजलेल्या वक्त्यांनी नाशिककरांना मंत्रमुग्ध केले. त्याचप्रमाणे आदरणीय कै. बाळासाहेब (भाऊ) देवराम वाघ यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक, के. के. वाघ फाऊंडेशन, श्री. बाळासाहेब वाघ वेलफेअर फाऊंडेशन, स्माईल व स्पिनॅच यांचे संयुक्त विद्यमाने काकासाहेबनगर, भाऊसाहेबनगर, वऱ्हेदारणा, पालखेड, चांदोरी, सरस्वतीनगर कॅम्पस येथे मोफत नेत्र, हृय व महिला आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले व यावेळी २२०० हून अधिक ग्रामस्थ व नागरिक यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलमार्फत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये विविध मल्टिनॅशनल उद्योगसमूहातर्फे कॅम्पस ड्राईव्ह पार पडले. यामध्ये एकूण ६५० हून अधिक






नवरदेवाचे फेटे, नाटकाचे साहित्य, फॅन्सी ड्रेस, देवांचे कपडे, मुकुट व महालक्ष्मीचे हात विकत तसेच भाड्याने मिळतील.
RB JARIWALA जरीवाला
नवरदेवाचा फेटा आकर्षक बांधून मिळण्याचे एकमेव ठिकाण
६५४, रविवार पेठ, नाशिक-१. फोन : २५७६५१०

ADMISSION OPEN